पुणे महानगरपालिका

*** शहर सुधारणा समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक – १६**

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दि. १२ /११/२०१० रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्रं. ९१**

**मा. विजय देशमुख व मा.सागर माळकर यांचे दि. २/११/२०१० चे पत्र.**

पुणे शहराच्या सन १९८२ च्या प्रारूप विकास आराखड्यात पुणे पेठ हडपसर स.नं.२६, २७ या मिळकतीच्या ओढ्याच्या कडेचा भाग पार्क या आरक्षणात दाखविला होता. मात्र १९८७ चा आराखडा मंजूर होते वेळी उपरोक्त पार्क साठीचे आरक्षण वगळून ते हरित पट्टा विभागात ( ग्रीन बेल्ट झोन ) मध्ये दर्शविण्यात आले प्रारूप आराखड्यानुसार स.नं.२७ पै.काही मिळकतीचा ओढयाच्याकडेचा भाग पुणे मनपाने संपादित केलेला असून मालकी म.न.पा.कडे आलेली आहे. सदर म.न.पा.चे.मालकीची जागा रस्त्याअभावी लॅन्डलॉक झालेली असल्याने त्या जागी गार्डन /पार्क या हेतुसाठी विकसन करता येत नाही. सबब या जागेसाठी काळे पडळ रस्त्यावरून ओढ्याच्याकडेने रस्ता तयार केल्यास पार्कसाठी रस्ता मिळेल व लहान मुलांचे क्रिडांगण करता येईल.

तरी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये काळे पडळ रस्त्यापासून उत्तरेकडे ओढ्याचेकडेने संपादित जागेपर्यंत ९ मी.रूंदीचा रस्ता आखण्यात यावा.

**विषय क्रं. ९२**

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये धार्मिक स्थळांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक काही अटींवर अनुज्ञेय करणेबाबत एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७ ( १ ) अन्वयेची कार्यवाही करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/न.अ./६९६, दि. २५/१०/२०१० चे पत्र.

**विषय क्रं. ९३**

पुणे मनपाच्या भवन रचना विभागाकडे गवंडी वर्ग – ४ ( वेतन श्रेणी रू.५२०० – २०२०० + ग्रेड पे + मान्य भत्ते ) या पदावरील नेमणूकीबाबत मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/७१३, दि. २५/१०/२०१० चे पत्र.

**विषय क्रं. ९४**

पुणे पेठ म.कर्वेनगर स.नं.३४ हि.नं.७ व ८ नटराज हौ.सोसा.येथील मिळकतीबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/न.अ./७१६, दि. २५/१०/२०१० चे पत्र.

**विषय क्रं. ९५**

वॉर्ड क्र.२४ मधील भाऊ पाटील रोड हा औंध रोड आंबेडकर चौक ते रेल्वे ब्रिज ते बोपोडी याठिकाणां पर्यंतचा रस्ता पुणे मनपाच्या ताब्यात आहे. रेल्वे ब्रिज ते मुंबई पुणे रोड हॅरिस ब्रिज मधून जाणारा रस्ता पुणे मनपाच्या ताब्यात नसल्याने सदर रस्ता कलम २०५ अन्वये आखून १०० फुटी डी.पी.रोड करण्याबाबत मा.सौ.शैलजा खेडेकर व मा.प्रकाश गलांडे यांचे दि. २६/१०/२००९ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३७,दि.२८/१०/२००९ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/न.अ/७४१ दि.२८/१०/२०१० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं. ९६</u>

पुणे महानगरपरिवहन महामंडळ लिमिटेडच्या मिळकती बी.ओ.टी.तत्वावर विकसित करताना २.५ चटई क्षेत्र निर्देशांक ( एफ.एस.आय.) मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/न.अ./७४३, दिनांक २९/१०/२०१० चे पत्र.

<u>विषय क्रं. ९७</u>

विकास नियंत्रण नियमावली,पुणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ ( १ ) ( अे अे ) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसारचा मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. १६ वाहनतळाबाबतच्या नियमातील टेबल क्र.६ मधील फेरबदलाचा प्रस्ताव बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/न.अ./६३४, दि. ११/१०/२०१० चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)**

<u>विषय क्रं. ९८</u>

पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी वॉटर शेड्स व स्टॉर्म वॉटर व्यवस्थापनबाबतचा मे.प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि.यांनी तयार केलेला अहवाल मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.मुख्य सभेचे निदर्शनास आणून देणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/अ.न.अ.(पथ )/५९८, दि. ११/१०/२०१० चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**